जैविक विविधता व्यवस्थापन समित्या

प्रत्येक गावातील स्थानिक लोकांच्या सहभागातून जैविक विविधता व्यवस्थापन समित्या स्थापन केल्या जातात. या समित्या ग्रामसभेच्या उपसमित्या म्हणून स्थापन केल्या जातात. ग्रामसभेने निवडलेल्या सात व्यक्तींचा त्यात समावेश असतो. त्यात १/३ महिला असतात. या समितीच्या कामामध्ये अमूल्य योगदान देऊ शकणाऱ्या वनस्पती तज्ञ, शेतकरी, व्यापारी व्यक्ती यात सदस्य म्हणून काम करतात. जैविक साधनसंपत्तीचे संवर्धन, ते टिकून राहील अशा प्रकारे त्याचा वापर आणि जैविक विविधतेतून प्राप्त होणाऱ्या लाभांचे न्याय्य वाटप निश्चित करणे हे जैव विविधता समितीचे प्रमुख कार्य आहे. याशिवाय लोक जैविक विविधता नोंदवही तयार करण्याचे कामही या व्यवस्थापन समितीस करावे लागते. याशिवाय प्राणी, सूक्ष्म जीवजंतू, वृक्ष, वारसा स्थळे, वनराई, देवराई, जलकुंड इत्यादींचे व्यवस्थापन करणेही अपेक्षित आहे. अतिविशिष्टया परिसरातील महत्त्वाच्या वनस्पती, प्राण्यांच्या जाती यांचे संवर्धन करणे जैव विविधतेबाबत जागरूकता निर्माण करणे ही समितीची प्रमुख कार्ये आहेत. ही व्यवस्थापन समिती वर्षातून चार सभा घेईल. किमान तीन महिन्यातून एक सभा आयोजित केली जाईल.

जैवविविधता व्यवस्थापन समित्यांची भूमिका आणि कार्य

पर्यावरणाचा समतोल राखून गावाचा विकास साधण्यासाठी गावपातळीवर जैवविविधता समित्यांची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र राज्य जैविक विविधता नियम २००८ नुसार या समित्यांची स्थापना करण्यात येत असल्याने समित्यांना काही अधिकार देण्यात आले आहेत तसेच त्यांची कार्येही नियमात नोंद करण्यात आली आहेत.

समितीची रचना

- ग्रामसभेच्या माध्यमातून समितीची स्थापना करण्यात येईल.
- सात व्यक्ती समितीवर निवडल्या जातील. आठवी व्यक्ती ग्रामसेवक असून ती या समितीचा सचिव असेल. त्यातून लोकशाही मार्गाने अध्यक्षांची निवड होईल.
- समितीत किमान एकतृतीयांश महिला असणे आवश्यक आहे.
- अनुसूचित जमाती अनुजातीच्या सदस्यांचा सहभाग आवश्यक असेल.
- वनस्पतीतज्ञ, शेतकरी, वनौषधी संकलक, व्यापारी, मच्छिमार, वैदू आदींचे प्रतिनिधी समितीत समाविष्ट असतील.
- विधानसभेचे स्थानिक सदस्य, संसद सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य निमंत्रित सदस्य असतील.

भूमिका

- ग्रामसभेच्या माध्यमातून जैवविविधता व्यवस्थापन समिती अस्तित्वात येईल. तिचा कार्यकाळ पाच वर्षांचा राहील.
- समिती अस्तित्वात येताच सर्वेक्षण गाव व परिसरातील जैवविविधतेची नोंद करावयाची आहे. लोक जैवविविधता नोंदवही तयार करून त्यात सर्व नोंदी ठेवल्या जातील.
- नष्ट होत चाललेल्या जैवविविधतेचे पुनर्स्थापना करण्याचे प्रयत्न समिती करेल.
- गावाची पर्यावरणविषयक माहिती, पारंपारिक ज्ञान याची वेळोवेळी राज्य जैव विविधता मंडळाला माहिती देणे.
- गावाच्या परिसरातील वारसा वृक्ष, प्राणी, सूक्ष्म जीवजंतू, वनराई, जलस्त्रोत यांचे संरक्षण समिती करेल.
- लोक जैवविविधता नोंदवहीत दिलेल्या माहितीच्या आधारावर प्रत्येक समितीची कामाची पद्धत तयार होईल.
- कामाचा आराखडा तयार करताना स्थानिक जैवविविधतेच्या संरक्षणाबरोबरच लोकशिक्षणासाठी समिती प्रयत्न करेल.
- स्थानिक जैवविविधतेचा सर्वांना समान उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न करणे. विशेषतः औषधी वनस्पती व त्यांच्याशी संबंधित पारंपरिक ज्ञान यांची सांगड घालून सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा तयार करेल.
- अतिविशिष्टया महत्त्वाच्या जाती व प्राण्यांच्या पारंपरागत जातींचे/ प्रकारांचे संवर्धन करणे.
- लोक जैविक नोंदवही मध्ये असणाऱ्या पारंपरिक ज्ञानाचे जतन करणे.

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

[illegible]
☎ [illegible]

22 MAY 2016
INTERNATIONAL DAY FOR BIOLOGICAL DIVERSITY
Mainstreaming Biodiversity
Sustaining People and their Livelihoods

जैवविविधता

दिलासा संस्थेचा परिचय

खेड्यांचा विकास हाच एक ध्यास घेऊन गेली २५ वर्षे दिलासा जनविकास प्रतिष्ठान ही संस्था पाणी, महिला सक्षमीकरण, प्रशिक्षण, कृषी विकास, उपजीविका विकास, शेतकऱ्यांचे संघटन आणि त्यांच्या कंपन्यांची स्थापना या विविध क्षेत्रात कार्य करीत आहे. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या विभागातील अत्यंत दुर्लक्षित, आडवळणाच्या विकासापासून दूर असलेल्या ४२८४ खेड्यांमध्ये संस्थेने विविध प्रकल्प राबविले. ग्रामीण विकास, पाणलोट क्षेत्र विकास, महिला सक्षमीकरण यातील गौरवास्पद कामाबद्दल संस्थेला राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या फुलंब्री तालुक्यातील ३० गावांमध्ये संस्था जैविक विविधता व्यवस्थापन समित्यांचे संघटन आणि क्षमता बांधणी हे काम करीत आहे. यातील भागात जैवविविधता या विषयाची लोकजागृती करून देण्यात आलेली आहे. तसेच जैविक विविधता व्यवस्थापन समितीच्या कार्याविषयी माहिती दिलेली आहे.

प्रास्ताविक

जीवन सुखी होण्यासाठी निसर्गाने मानवाला अनेक प्रकारची संपत्ती दिली आहे. अन्न, हवा, पाणी, प्रकाश इत्यादी. जैव विविधता हा मानवाला निसर्गाने दिलेला मौल्यवान ठेवा तर आहेच शिवाय जैवविविधता हे मानवाला पृथ्वीवर जिवंत ठेवणारे सर्वात महत्त्वाचे नैसर्गिक भांडार आहे. **एका विशिष्ट वातावरणात वेगवेगळ्या प्रकारच्या आणि वेगवेगळ्या संख्येच्या सजीवांनी एकत्रित राहणे म्हणजे जैव विविधता होय.**

या विविधतेमुळेच आपल्याला अन्न, वस्त्र, लाकूड, ऊर्जा, हवा मिळते. मानवाची अन्नसुरक्षितता ही जैव विविधतेवर अवलंबून आहे. निसर्गाशिवाय मानवाचे संपूर्ण जीवन अपूर्ण आहे. किंबहुना मानवाचे अस्तित्वच निसर्गावर अवलंबून आहे. हजारो वर्षांपासून निसर्ग आणि मानव यांचा अतूट संबंध आहे. मानवाला त्यापासून वेगळे करता येणे शक्य नाही. निसर्गाचा नाश म्हणजेच मानवजातीचा नाश.

माणसाच्या सभोवती अनेक वनस्पती असतात, तसेच प्राणी, आणि सूक्ष्म जीवही असतात. त्यांना सजीव म्हटले जाते. त्या प्रत्येकाचा आकार, प्रकार, रचना, कार्य वेगवेगळे असते. तरी देखील हे सर्व पृथ्वीवर एकत्रितपणे राहत असतात. त्या प्रत्येकाला या पृथ्वीवर स्वतंत्र अस्तित्व असते. वेगवेगळ्या जातींच्या, वेगवेगळ्या संख्येने असलेल्या सजीवांच्या एकत्रिकरणातून जैवविविधता निर्माण होते.हे विविध प्रकारचे प्राणी, वनस्पती, सूक्ष्म जीव माणसाला अनेक प्रकारे साहाय्य करतात. दैनंदिन जीवनामध्ये माणसाला अन्नधान्य, फळे, भाज्या, कापूस, लाकूड, मांस, दूध, तूप, लोणी, अंडी यासारखे पदार्थ जैवविविधतेमुळेच मिळतात. प्रत्येक प्राण्याला निसर्गाने काहीतरी काम नेमून दिलेले आहे. या सर्वांच्या योगदानातूनच मानवी जीवन समृद्ध होते. जैवविविधता ही माणसाच्या सुखाची गुरुकिल्ली आहे.

जैव विविधता आणि भारत

जैवविविधतेच्या दृष्टीने समृद्ध असलेल्या देशांच्या यादीत भारताचा नंबर चार [illegible] आहे. भारतात आढळणाऱ्या अनेक वनस्पती, प्राणी जगभरात कुठेही आढळून येत नाहीत. भारतात ३५० सस्तन प्राणी, रंगीबेरंगी पक्ष्यांच्या १२०० जाती, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ४५३ जाती आहेत. तसेच भारतात सुमारे ४५००० वनस्पती आणि कीटकांच्या ५०००० जाती आहेत. पैकी १८ टक्के वनस्पती जगात कुठेही सापडत नाहीत. [illegible] १५३ पक्षांच्या प्रजातींच्या २७, बेडकांच्या ४०, [illegible] २२ आणि माशांच्या ८ जाती दिसून येतात.

जैवविविधतेचे फायदे

१. जैव विविधतेमुळे माणसाला भाज्या, फळे, मांस प्राण्यांची कातडी, दूध, तूप, लोणी असे वेगवेगळी उत्पादने उपलब्ध होतात. तसेच डिंक, मेण, मध, रबर यासारखी उपयुक्त जंगलउत्पादने जैव विविधतेमुळेच मिळतात. जंगले वायुप्रदूषण कमी करतात.
२. माणसाला उपयोगी असणारी ५० टक्के औषधे वनस्पतींपासून तयार होतात. भारतातील जंगले ही दुर्मिळ औषधी वनस्पतींचे भांडार आहे.
३. वनस्पती, झाडे प्राणवायूची निर्मिती करतात. त्या हवेतील कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात. त्यामुळे हवेतील कार्बन डायऑक्साईड चे प्रमाण कमी होते.
४. जमिनीवर जंगलांचे आच्छादन असल्यामुळे जमिनीची धूप थांबते आणि पर्जन्यमान वाढण्यास मदत होते. अनेक सजीवांना आसरा मिळतो, वाळवंटीकरणाला प्रतिबंध होतो, पर्यावरणसंतुलन राखले जाते.
५. मातीमध्ये असणारे जिवाणू, सूक्ष्म जीव जमिनीची सुपिकता वाढवतात.
६. प्राण्यांच्या शरीरातील मलमूत्र, शेण यांचा शेतीसाठी खत म्हणून उपयोग होतो त्यामुळे जमिनीची उत्पादकता वाढते तसेच गोबर गॅस ही निर्माण होतो.
७. गांडूळासारखा छोटा प्राणी जमीन भुसभुशीत राखण्याचे महत्त्वाचे काम करतो.
जैव विविधतेमुळे अनेक पिकांमध्ये संकर होऊन नवीन जाती तयार झाल्या.

जैवविविधतेला असलेले धोके

भारतासाठी ही अमूल्य अशी जैवविविधता सध्या धोक्यात आली आहे. जैवविविधतेला असलेले धोके पुढीलप्रमाणे - वन्यजीवांचा दुरुपयोग केल्यामुळे अनेक प्रजातींचा नाश, २) कीटकनाशकांच्या अनियंत्रित वापरामुळे अनेक प्रजातींची हानी, ३) मोकाट चराईमुळे जमिनीची धूप, जमिनीवरील गवत/ वनस्पती यांच्यावरील आच्छादनाचा नाश, ४) [illegible], ५) हवामान बदल, ६) नैसर्गिक संपत्तीचे शोषण, ७) चंगळवादी प्रवृत्ती, ८) लोकसंख्येचा वाढता दर, ९) जमिनीच्या वापराच्या चुकीच्या पद्धती आणि प्रकार

जैवविविधतेचा नाश

माणसाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविचाराने अति वापर केला त्यामुळे ती नष्ट पावत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची परिस्थिती बिकट आहे. जमिनीतील पाण्याचा अति उपसा केल्यामुळे ते हळूहळू संपत चालले आहे. त्यामुळेच [illegible] पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. [illegible] किनाऱ्यावरील, डोंगरातील झाडांची कत्तल केल्यामुळे जमिनीची धूप वाढली आहे. नदीनाल्यांमधील गाळ वाढत आहे. [illegible] वाढून गेल्या, नद्या नामशेष होत आहेत. गिधाड, घुबड, माळढोक, यासारखे पक्षी नामशेष होत आहेत. पूर्वी दिसणारे चिमण्यांचे थवे दुर्मिळ होत चालले आहेत. चित्ता, वाघ, गुलाबी डोक्याचे बदक, गिधाड हे प्राणीही शिकारीमुळे कमी होत आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे माणसाने जंगल नष्ट करून इमारती बांधल्या, तसेच औद्योगिकीकरण केले. [illegible] मासेमारी, प्रचंड धरणांचे बांधकाम, खाणकाम या कृतींमुळे प्राणी, पक्षी यांचा अधिवास नाहीसा होत आहे. जंगलातील पाण्याचे साठे संपुष्टात आल्याने पाण्यासाठी, अन्नासाठी जंगलातील प्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत.

रासायनिक खतांचा मारा, कीटकनाशकांचा वाढता वापर यामुळे मातीचे आरोग्य बिघडत आहे. हवेचे, पाण्याचे प्रदूषण वाढले आहे. माणसाने निसर्गात केलेली ढवळाढवळ, औद्योगिकीकरण, शहरीकरण, या सगळ्यांचे परिणाम आज दिसत आहे. निसर्गातील माणसाचा हा हस्तक्षेप आता अनेक संकटे घेऊन येत आहे. हवा, पाणी यांचे प्रदूषण, वाढते तापमान, बिघडत चाललेले पावसाचे चक्र, दुष्काळ यासारखी संकटे समोर येत आहेत. माणूस पृथ्वीवर टिकायचा असेल तर, जैव विविधतेचे संरक्षण हे आपले प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी - १) निसर्गाचा समतोल कायम राखणे, २) वन्यजीवांचे संरक्षण करणे, ३) दुर्मिळ वनस्पती, प्राणी, पक्षी यांचे जतन करणे, ४) जंगलतोड थांबविणे इत्यादी गोष्टींची आवश्यकता आहे.

जैवविविधतेच्या संरक्षणासाठी काय करावे?

१) आपल्या घराच्या परिसरात, शेतात वेगवेगळी झाडे लावा. परिसरातील झाडांचे संरक्षण करा. त्यामुळे पक्षी, कीटक यांच्यासाठी निवारा तयार होऊन निसर्गातल्या अन्नसाखळीची जोपासना होईल.
२) गावातील डोंगरांचे अतिक्रमणापासून रक्षण करा.
३) परिसरातील जंगली प्राण्यांना त्रास देऊ नका. फुलपाखरे, वेगवेगळे कीटक, बेडूक, साप, सरडे यांच्याशी दुष्टपणे वागू नका.
४) पक्ष्यांसाठी आपल्या परिसरात मातीच्या पसरट भांड्यात पाणी, अन्न ठेवू शकता.
५) रासायनिक कीटकनाशकांची बेसुमार फवारणी करणे टाळा. मित्रकीटकांचे संवर्धन करा.
६) [illegible], कोळी यासारखे प्राणी मारू नका हे कीटकनाशकांचे कार्य करीत असतात.
७) जमिनीची धूप टाळण्यासाठी, शिवारात ओल टिकून राहण्यासाठी जमिनीचा पृष्ठ भाग गवताच्या थराने झाकून ठेवा. वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची, झुडपांची, रोपांची दरवर्षी लागवड करीत जा.
८) जमिनीचा कस टिकून ठेवण्यासाठी पिकांची फेरपालट करा.
९) घरातील, शेतातील कचरा कंपोस्ट खड्ड्यात टाकून तयार झालेले खत जमिनीसाठी वापरा. त्यामुळे जमिनीचा कस वाढून आरोग्य सुधारेल.
१०) [illegible] ते जाळू नका. ते तसेच ठेवा, त्यामुळे नैसर्गिक खत तयार होईल.